कन्नमवारनगरची पुर्नबांधणी वास्तुशास्त्रानुसार होण्यासाठी स्थानिकांनी आग्रही रहावे.
- वास्तुशास्त्रतज्ञ डॉ.रविराज अहिरराव

विक्रोळी, दि.६ नोव्हेंबर : कन्नमवारनगरच्या पुर्नविकासाची चर्चा सध्या जोरात सुरु आहे. पुर्नबांधणीची काही काम सुरु झाली आहेत. या पार्श्वभूमीवर कन्नमवारनगरची पुर्नबांधणी वास्तुशास्त्राच्या आधारे केल्यास सर्वांनाच त्याचा लाभ होईल आणि हयासाठी पुर्नरचना वास्तुशास्त्राच्या प्रमाणे व्हावी यासाठी स्थानिक रहिवाश्यांनी विकासकाकडे आग्रह धरावा. पुर्नविकास करताना कन्नमवारनगर येथे बिल्डर्स, आर्किटेक्स् यांनी वास्तुतज्ञांना बरोबर घ्यावे व त्यांच्या सहकार्याने रचना करावी असे ठाम प्रतिपादन वास्तुशास्त्रतज्ञ डॉ.रविराज अहिरराव यांनी केले. दिवाळीच्या पूर्वसंध्येला मुंबईचे माजी महापौर दत्ता दळवी व स्थानिक शिवसेना शाखेच्यावतीने वास्तुरविराज हा वास्तुशास्त्र विषयक माहिती देणारा कार्यक्रम योजला होता. येथील विद्याविकास एज्युकेशन सोसायटीच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला. डॉ.रविराज अहिरराव आपल्या भाषणात म्हणाले, मानवी जीवनातील प्रत्येक गोष्टीवर वास्तुशास्त्राचा प्रभाव असतो. वास्तूमधील चांगले गुण व वाईट दोष बरे-वाईट परिणाम करतात. वास्तूशास्त्राच्या आधारे कुठलीही तोडफोड न करता उपाययोजना करुन वास्तू लाभदायी करता येते. कन्नमवारनगर येथे पुर्नरचनेनंतर निर्माण होणा-या वास्तुंचा आनंद घ्यायचा असेलतर पुर्नबांधणी वास्तुशास्त्राच्या आधारे होण्याचा निश्चितच उपयोग आहे. आपण वास्तूत केलेली आर्थिक गुंतवणूक फायदेशीर ठरण्यासाठी वास्तुरचना वास्तुशास्त्राप्रमाणे करणे गरजेचे आहे" असे सांगून डॉ. अहिरराव म्हणाले, "वास्तू घडविणे किंवा बिघडविणे आपल्या हातात आहे. मानवीजीवन सुखी करण्यासाठी वास्तूंची रचना निर्दोष असावी. केवळ निवासी नव्हेतर अनिवासी सर्वप्रकारच्या वास्तूंची रचना वास्तूशास्त्रा प्रमाणे करणे आवश्यक आहे. वास्तूशास्त्राचा आग्रहधरणे यात खर्च नाही. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी महापौर दत्ता दळवी यांनी केले तर आभार प्रदर्शन शाखा प्रमुख उपेंद्र सावंत यांनी केले.